महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सेक्टर ११, सरोवर विहार समोर, बेलापूर सीबीडी, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९३८५९००
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

**क्रमांक: एनओटी-३६१७/प्र.क्र.५३६/२०२४/जाहिरात** **जाहिरात क्रमांक : १०६/२०२५**

## महाराष्ट्र गट-ब (अराजपत्रित) सेवा संयुक्त मुख्य परीक्षा — २०२४

राज्य शासनाच्या सेवेतील विविध गट-ब (अराजपत्रित) संवर्गासाठी आयोगामार्फत **महाराष्ट्र गट-ब (अराजपत्रित) सेवा संयुक्त पूर्व परीक्षा — २०२४** करीता जाहिरात क्रमांक ०४८/२०२४ दिनांक ०९ ऑक्टोबर, २०२४ रोजी प्रसिदृध करण्यात आली असून पूर्व परीक्षा दिनांक ०२ फेब्रुवारी, २०२५ रोजी घेण्यात आली होती. सदर संयुक्त पूर्व परीक्षेचा निकाल **दिनांक १९ मे, २०२५** रोजी जाहीर करण्यात आला असून निकालाआधारे मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांकरीता मुख्य परीक्षा **रविवार, दिनांक २९ जून, २०२५ रोजी** अमरावती, छत्रपती संभाजी नगर, नागपूर, नाशिक, नवी मुंबई व पुणे जिल्हा केंद्रांवर आयोजित करण्यात येईल.

### २. अर्ज सादर करण्याची प्रक्रिया/कालावधी :-

प्रस्तुत जाहिरातीमध्ये विहित केलेल्या अटी व शर्तीची पुर्तता करणाऱ्या उमेदवारांकडून आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीद्वारे अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | तपशील | विहित कालावधी |
|---|---|---|
| १ | अर्ज सादर करण्याचा कालावधी | **दिनांक २० मे, २०२५ रोजी १४.०० पासून**<br>**दिनांक ०३ जून, २०२५ रोजी २३:५९ वाजेपर्यंत** |
| २ | ऑनलाईन पद्धतीने विहित परीक्षा शुल्क भरण्याचा अंतिम दिनांक | **दिनांक ०३ जून, २०२५ रोजी २३:५९ वाजेपर्यंत** |
| ३ | भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे परीक्षा शुल्क भरण्यासाठी चलनाची प्रत घेण्याचा दिनांक | **दिनांक ०५ जून, २०२५ रोजी २३:५९ वाजेपर्यंत** |
| ४ | चलनाद्वारे परीक्षा शुल्क भरण्याचा अंतिम दिनांक | **दिनांक ०६ जून, २०२५ रोजी बँकेच्या कार्यालयीन वेळेमध्ये** |

**३.** प्रस्तुत परीक्षेमधून भरावयाच्या विविध संवर्गातील पदांचा तपशील खालीलप्रमाणे आहे :-

**१. सहायक कक्ष अधिकारी, गट-ब (अराजपत्रित) :-**

**१.१ विविध मंत्रालयीन प्रशासकीय विभाग (एकूण ५४ पदे)**

| प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | इ.मा.व. | वि.मा.प्र. | सा. आणि शै. मागास वर्ग. | आ.दु.घ. | एकूण आरक्षित पदे | अराखीव पदे | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पदसंख्या | ६ | ३ | -- | १ | १ | ३ | ८ | -- | ५ | ५ | ३२ | २२ | ५४ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :- | | | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | ३ | २ | -- | १ | १ | २ | ५ | -- | ४ | ३ | २१ | १४ | ३५ |
| महिला | २ | १ | -- | -- | -- | १ | २ | -- | १ | २ | ९ | ७ | १६ |
| खेळाडू | १ | -- | -- | -- | -- | -- | १ | -- | -- | -- | २ | १ | ३ |
| दिव्यांग | **एकूण ०२ पदे -** अस्थिव्यंगता / मेंदुचा पक्षघात (Cerebral Palsy) / कुष्ठरोग मुक्त (Leprosy Cured) / शारीरिक वाढ खुंटणे (Dwarfism) / आम्ल हल्लाग्रस्त (Acid Attack Victims) / स्नायु विकृती (Muscular Dystrophy) | | | | | | | | | | | | |
| अनाथ | **एकूण ०१ पद — संस्थात्मक** | | | | | | | | | | | | |

**१.२ महाराष्ट्र लोकसेवा आयोग (एकूण ०१ पद)**

| प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | इ.मा.व. | वि.मा.प्र. | सा. आणि शै. मागास वर्ग. | आ.दु.घ. | एकूण आरक्षित पदे | अराखीव पदे | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पदसंख्या | -- | -- | -- | १ | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | -- | १ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :- | | | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | -- | -- | -- | १ | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | -- | १ |
| महिला | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| खेळाडू | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| दिव्यांग | -- | | | | | | | | | | | | |
| अनाथ | -- | | | | | | | | | | | | |

**२. राज्य कर निरीक्षक, गट-ब, (अराजपत्रित) (एकूण २०९ पदे)**

| प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | इ.मा.व. | वि.मा.प्र. | सा. आणि शै. मागास वर्ग. | आ.दु.घ. | एकूण आरक्षित पदे | अराखीव पदे | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पदसंख्या | २० | -- | ६ | ४ | २ | ४ | ३७ | १ | २१ | २१ | ११६ | ९३ | २०९ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :- | | | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | १३ | -- | ४ | ३ | १ | ३ | २४ | १ | १४ | १४ | ७७ | ६० | १३७ |
| महिला | ६ | -- | २ | १ | १ | १ | ११ | -- | ६ | ६ | ३४ | २८ | ६२ |
| खेळाडू | १ | -- | -- | -- | -- | -- | २ | -- | १ | १ | ५ | ५ | १० |
| दिव्यांग | **एकूण - ०८ पदे** [ **०३ पदे-** अंध / अल्पदृष्टी (Blind / Low Vision), **०२ पदे -** कर्णबधीरता अथवा ऐकु येण्यातील दुर्बलता (Deaf / Hard Hearing), **०१ पदे -** अस्थीव्यंगता / मेंदुचा पक्षघात (Cerebral Palsy) / कुष्ठरोग मुक्त (Leprosy Cured) / शारीरिक वाढ खुंटणे (Dwarfism) / आम्ल हल्लाग्रस्त (Acid Attack Victims) / स्नायु विकृती (Muscular Dystrophy, **०२ पदे -** स्वमग्नता (Autism) / मंदबुध्दी किंवा आकलन क्षमतेची कमतरता (Intellectual Disability) / विशिष्ट शिक्षण अक्षमता (Specific Learning Disability) / मानसिक आजार (Mental Illness) तसेच बहिरेपणा व अंधत्वासह एकापेक्षा जास्त प्रकारचे दिव्यांगत्व] | | | | | | | | | | | | |
| अनाथ | **एकूण ०२ पदे** [०१ पद - **संस्थात्मक,** ०१ पद - **संस्थाबाह्य** ] | | | | | | | | | | | | |

| **३. पोलीस उपनिरीक्षक, गट-ब (अराजपत्रित) (एकूण २१६ पदे)** | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **प्रवर्ग** | **अ.जा.** | **अ.ज.** | **वि.जा. (अ)** | **भ.ज. (ब)** | **भ.ज. (क)** | **भ.ज. (ड)** | **इ.मा.व.** | **वि.मा.प्र.** | **सा. आणि शै. मागास वर्ग.** | **आ.दु.घ.** | **एकूण आरक्षित पदे** | **अराखीव पदे** | **एकूण पदे** |
| पदसंख्या | २१ | १८ | १५ | ५ | १२ | ६ | ५५ | ८ | २२ | २२ | १८४ | ३२ | २१६ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :- | | | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | १४ | १२ | १० | ३ | ७ | ४ | ३६ | ६ | १४ | १४ | १२० | २० | १४० |
| महिला | ६ | ५ | ४ | २ | ४ | २ | १६ | २ | ७ | ७ | ५५ | १० | ६५ |
| खेळाडू | १ | १ | १ | -- | १ | -- | ३ | -- | १ | १ | ९ | २ | ११ |
| दिव्यांग | -- | | | | | | | | | | | | |
| अनाथ | **एकूण ०२ पदे - १-संस्थात्मक व १-संस्थाबाह्य** | | | | | | | | | | | | |

**४. पदसंख्या व आरक्षणासंदर्भात सर्वसाधारण तरतुदी :-**

**४.१** भरावयाच्या उपरोक्त संवर्ग/पदांचा सामाजिक/समांतर आरक्षणाबाबतचा तपशील शासनाच्या मागणीपत्रानुसार आहे. तसेच, वर नमूद केलेल्या पदसंख्या व आरक्षणामध्ये शासनाच्या सूचनेनुसार बदल होण्याची शक्यता आहे.

**४.२** शासनाकडून प्राप्त पदसंख्या व आरक्षणामध्ये बदल झाल्यास याबाबतची घोषणा/सूचना वेळोवेळी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेल्या घोषणा/सूचनांच्या आधारे प्रस्तुत परीक्षेमधून भरावयाच्या पदाकरीता भरती प्रक्रिया राबविण्यात येईल.

**४.३** विविध सामाजिक प्रवर्ग, महिला, प्राविण्यप्राप्त खेळाडू, अनाथ इत्यादींसाठी सामाजिक व समांतर आरक्षण शासनाकडून वेळोवळी जारी करण्यात येणाऱ्या आदेशानुसार राहील.

**४.४** शासन निर्णय, महिला व बाल विकास विभाग, क्रमांक-महिआ२०२३/प्र.क्र.१२३/कार्या-२, दिनांक ०४ मे, २०२३ अन्वये विहित कार्यपद्धतीनुसार अराखीव महिलांकरीता आरक्षित पदावरील निवडीसाठी, अराखीव महिला तसेच सर्व मागास प्रवर्गातील महिलांकरीता नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र सादर करण्याची अट रद्द करण्यात आली आहे.

**४.५** अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती वगळता अन्य मागास प्रवर्गातील महिलांकरीता आरक्षित पदावरील निवडीसाठी दावा करू इच्छिणाऱ्या महिलांना संबंधित मागास प्रवर्गासाठी इतर मागास व बहुजन कल्याण विभाग तसेच सामान्य प्रशासन विभागाकडून वेळोवेळी विहित करण्यात आल्याप्रमाणे नॉन-क्रीमीलेअर प्रमाणपत्र सादर करण्याबाबतच्या तरतुदी लागू राहतील.

**४.६** महिलांसाठी आरक्षित पदांकरिता दावा करणा-या उमेदवारांनी महिला आरक्षणाचा लाभ घ्यावयाचा असल्यास त्यांनी अर्जामध्ये न चुकता महाराष्ट्राचे अधिवासी (Domiciled) असल्याबाबत तसेच अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती वगळून इतर सर्व मागास प्रवर्गातील महिलांसाठी नॉन-क्रिमिलेअरमध्ये मोडत असल्याबाबतचा स्पष्टपणे दावा करणे आवश्यक आहे.

**४.७** विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क) व भटक्या जमाती (ड) प्रवर्गासाठी आरक्षित असलेली पदे आंतरपरिवर्तनीय असून आरक्षित पदासाठी संबंधित प्रवर्गातील योग्य व पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास अद्ययावत शासन धोरणाप्रमाणे उपलब्ध प्रवर्गातील उमेदवाराचा विचार गुणवत्तेच्या आधारावर करण्यात येईल.

**४.८** अर्ज करताना एखादी जात/जमात राज्य शासनाकडून आरक्षणासाठी पात्र असल्याचे घोषित केली असल्यासच तसेच सक्षम प्राधिकाऱ्याने प्रदान केलेले प्रमाणपत्र उमेदवाराकडे उपलब्ध असेल तर संबंधित जात/जमातीचे उमेदवार आरक्षणाच्या दाव्यासाठी पात्र असतील.

**४.९** समांतर आरक्षणाबाबत शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसआरव्ही-१०१२/प्र.क्र.१६/१२/१६-अ, दिनांक १३ ऑगस्ट, २०१४ तसेच शासन शुध्दीपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक संकीर्ण-१११८/प्र.क्र.३९/१६-अ, दिनांक १९ डिसेंबर, २०१८ आणि तदनंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल.

**४.१०** आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांतील (ईडब्लूएस) उमेदवारांकरीता शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: राआधो-४०१९/प्र.क्र.३१/१६-अ, दिनांक १२ फेब्रुवारी, २०१९ व दिनांक ३१ मे, २०२१ आणि तदनंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल. तसेच सदर संवर्गातील उमेदवारांकरीता शासन निर्णयान्वये विहित करण्यात आलेले प्रमाणपत्र, कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.

**४.११** सदर जाहिरात सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग अधिनियम दिनांक २६ फेब्रुवारी २०२४ व संबंधित शासन निर्णय दिनांक २७ फेब्रुवारी, २०२४ संदर्भात मा. उच्च न्यायालयात दाखल झालेल्या न्यायिक प्रकरणातील अंतिम न्यायनिर्णयाच्या अधीन राहून प्रसिद्ध करण्यात येत आहे. या जाहिराती संबंधित शिफारशी व नियुक्त्या मा. उच्च न्यायालय, मुंबई येथिल रिट याचिका क्रमांक ३४६८/२०२४ व इतर न्यायिक प्रकरणाच्या अधीन राहून करण्यात येतील. त्या अनुषंगाने आयोगामार्फत दिनांक २६ एप्रिल, २०२४ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेले प्रसिद्धीपत्रक जाहीरातीस लागू राहतील.

**४.१२** शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: बीसीसी/प्र.क्र.७५/१६-क, दिनांक २७ फेब्रुवारी, २०२४ अन्वये सामाजिक व शैक्षणिक मागासवर्गाकरीता आरक्षण विहित करण्यात आले असून शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग , क्रमांक बीसीसी-२०२४/प्र.क्र.७५/आरक्षण-५, दिनांक २८ जून, २०२४ व ०५ जुलै, २०२४ अन्वये विहित करण्यात आलेले जात प्रमाणपत्र आणि नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

**४.१३** शासन शुद्धिपत्रक, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, क्रमांक : संकीर्ण-२०२३/प्र.क्र.७६/मावक, दिनांक ०९ मार्च, २०२३ अन्वये शासनाकडून जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार, संबंधित उमेदवार उन्नत आणि प्रगत व्यक्ती/गटात मोडत नसल्याबाबतची पडताळणी करण्यासाठी सन **२०२३-२०२४** या आर्थिक वर्षाचे उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य राहील.

४.१४ सेवा प्रवेशाच्या प्रयोजनासाठी शासनाने मागास म्हणून मान्यता दिलेल्या समाजाच्या वयोमर्यादेमध्ये सवलत घेतलेल्या उमेदवारांचा अराखीव (खुला) पदावरील निवडीकरीता विचार करणेबाबत शासनाच्या धोरणानुसार कार्यवाही करण्यात येईल. याबाबतचा तपशील वेळोवेळी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.

४.१५ अराखीव (खुला)सर्वसाधारण पदावरील शिफारशीकरीता गुणवत्तेच्या आधारे सर्व उमेदवारांचा (मागासवर्गीय उमेदवारांसह) विचार होत असल्याने, सर्व आरक्षित प्रवर्गातील उमेदवारांनी त्यांच्या प्रवर्गासाठी पद आरक्षित/उपलब्ध नसले तरी, अर्जामध्ये त्यांच्या मूळ प्रवर्गासंदर्भातील माहिती अचूकपणे नमूद करणे बंधनकारक आहे.

४.१६ कोणत्याही प्रकारच्या आरक्षणाचा लाभ हा केवळ महाराष्ट्राचे सर्वसाधारण रहिवासी असणाऱ्या उमेदवारांना अनुज्ञेय आहे. सर्वसाधारण रहिवासी या संज्ञेला भारतीय लोकप्रतिनिधत्व कायदा १९५० च्या कलम २० अनुसार जो अर्थ आहे तोच अर्थ असेल.

४.१७ सामाजिक अथवा समांतर आरक्षणाचा अथवा सोयी सवलतींचा दावा करणा-या उमेदवाराकडे संबंधित कायदा / नियम / आदेशानुसार विहित नमुन्यातील पूर्व परीक्षेच्या जाहिरातीस अनुसरुन अर्ज स्वीकारण्यासाठी विहित केलेल्या दिनांकापूर्वीचे वैध प्रमाणपत्र उपलब्ध असणे अनिवार्य आहे. वैध प्रमाणपत्रांचा कालावधी संबंधित शासन आदेशावरील तरतुदीनुसार (लागू असेल त्याप्रमाणे) ग्राह्य समजण्यात येईल.

४.१८ सामाजिक व समांतर आरक्षणासंदर्भात विविध न्यायालयामध्ये दाखल न्यायप्रविष्ट प्रकरणी अंतिम निर्णयाच्या अधीन राहून पदभरतीची कार्यवाही करण्यात येईल.

**४.१९ खेळाडू आरक्षण :-**

४.१९.१ शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक: राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक १ जुलै, २०१६, तसेच शासन शुध्दीपत्रक, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक:राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक १८ ऑगस्ट, २०१६, शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक: संकीर्ण-१७१६/प्र.क्र.१८/क्रीयुसे-२, दिनांक ३० जून, २०२२, शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक: खेआक्ष-२९२३/प्र.क्र.५७/का-१३, दिनांक ०७ जून, २०२३ आणि तदनंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार प्राविण्य प्राप्त खेळाडू आरक्षणासंदर्भात तसेच वयोमर्यादेतील सवलतीसंदर्भात कार्यवाही करण्यात येईल.

४.१९.२ प्राविण्य प्राप्त खेळाडू व्यक्तींसाठी आरक्षणाचा दावा करणा-या उमेदवारांच्या बाबतीत क्रीडा विषयक विहित अर्हता धारण करीत असल्याबाबत तसेच उमेदवार कोणत्या संवर्गातील खेळाडूसाठी आरक्षित पदावर निवडीकरीता पात्र ठरतो, याविषयी संबंधित विभागीय क्रीडा उपसंचालक यांनी प्रदान केलेला विहित नमुन्यातील प्राविण्य प्रमाणपत्र पडताळणीबाबतचा अहवाल (शासन निर्णय दिनांक ०१ जुलै, २०१६ सोबतचे परिशिष्ट " क ") पूर्व परीक्षेस अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकाचा किंवा तत्पूर्वीचा असणे तसेच सदर पडताळणी अहवाल अर्जासोबत अपलोड करणे अनिवार्य आहे.

४.१९.३ विहित नमुन्यातील प्राविण्य प्रमाणपत्र पडताळणीबाबतचा अहवाल उपलब्ध नसलेल्या उमेदवारांच्या बाबतीत खेळाचे प्राविण्य प्रमाणपत्र योग्य दर्जाचे असल्याबाबत तसेच तो खेळाडू उमेदवार खेळाडूसाठी आरक्षित पदावरील निवडीकरीता पात्र ठरतो, याविषयीच्या पडताळणीकरीता त्यांचे प्राविण्य प्रमाणपत्र संबंधित विभागीय उपसंचालक कार्यालयाकडे पूर्व परीक्षेस अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकापूर्वीच सादर करणे तसेच सक्षम प्राधिकरणाकडे क्रीडा प्रमाणपत्र पडताळणीसाठी केलेल्या अर्जाची पोच पावती अर्जासोबत अपलोड करणे अनिवार्य आहे. अन्यथा प्राविण्य प्राप्त खेळाडू आरक्षणाकरीता पात्र समजण्यात येणार नाही.

४.१९.४ पूर्व परीक्षेस अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकाचा किंवा तत्पूर्वीचा विभागीय क्रीडा उपसंचालक यांचा विहित नमुन्यातील प्राविण्य प्रमाणपत्र पडताळणी अहवाल सादर केला नसल्यास अथवा विहित दिनांकापूर्वी सक्षम प्राधिकरणाकडे क्रीडा प्रमाणपत्र पडताळणीसाठी केलेल्या अर्जाची पोचपावती सादर केली नसल्यास , संबंधित उमेदवाराचा खेळाडू आरक्षणाचा दावा विचारात घेतला जाणार नाही .

४.१९.५ पूर्व परीक्षेच्या प्रवेशाकरीता प्राविण्य प्रमाणपत्र पडताळणीसाठी सादर केलेल्या अर्जाची पोच पावती अपलोड केलेल्या उमेदवाराने मुख्य परीक्षा/कागदपत्रे पडताळणी/मुलाखतीच्यावेळी विहित अर्हता धारण करीत असल्याबाबत सक्षम प्राधिका-याने प्रमाणित केलेले प्राविण्य प्रमाणपत्र तसेच प्राविण्य प्रमाणपत्र योग्य असल्याबाबत आणि खेळाडू कोणत्या संवर्गातील खेळाडूसाठी आरक्षित पदावरील निवडीकरीता पात्र ठरतो, याविषयीचा संबंधित विभागीय क्रीडा उपसंचालक यांनी प्रदान केलेले प्राविण्य प्रमाणपत्र पडताळणीबाबतचा अहवाल सादर केला तरच उमेदवारांचा संबंधित संवर्गातील खेळाडूसाठी आरक्षित पदावर निवडीकरीता विचार करण्यात येईल.

४.१९.६ एकापेक्षा जास्त खेळांची प्राविण्य प्रमाणपत्रे असणा-या खेळाडू उमेदवाराने एकाच वेळेस सर्व खेळांची प्राविण्य प्रमाणपत्रे प्रमाणित करण्याकरीता संबंधित उपसंचालक कार्यालयाकडे सादर करणे बंधनकारक आहे.

**४.२० दिव्यांग आरक्षण :-**

४.२०.१ दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ च्या आधारे शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: दिव्यांग २०१८/प्र.क्र.११४/१६ अ, दिनांक २९ मे, २०१९ तसेच यासंदर्भात शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार दिव्यांग व्यक्तींच्या आरक्षणासंदर्भात कार्यवाही करण्यात येईल.

४.२०.२ प्रस्तुत परीक्षेमधून भरण्यात येणा-या विविध संवर्ग/पदांकरीता दिव्यांग सुनिश्चिती संदर्भातील तपशील खालीलप्रमाणे आहे :-

| अ.क्र. | पदाचे नांव | शासन आदेश | पात्र दिव्यांगत्वाचा प्रकार |
|---|---|---|---|
| १ | सहायक कक्ष अधिकारी | शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. कअस-१३१९/प्र.क्र.७४/१४-ब, दिनांक २६ फेब्रुवारी, २०२१ | (१) B, LV<br>(२) D, HH,<br>(३) OA, BA, OL, BL, OAL, CP, LC, DW, AAV,<br>(४) SLD, MI<br>(५) MD involving (१) to (४) above |

| | | | |
|---|---|---|---|
| २ | राज्य कर निरीक्षक | शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक: विकवि-१०२१/ प्र.क्र.१३/वि.प्र.-४, दिनांक २५ फेब्रुवारी, २०२१ | (१) B, LV<br>(२) D, HH,<br>(३) OA, BA, OL, BL, OAL, CP, LC, DW, AAV,<br>(४) SLD, MI<br>(५) MD involving (१) to (४) above |
| ३ | पोलीस उपनिरीक्षक | शासन निर्णय, गृह विभाग क्रमांक पोलीस-१८२१/ प्र.क्र.५२/पोल-५अ, दिनांक ०४ ऑगस्ट, २०२१ | दिव्यांग उमेदवार पात्र नाही. |

**४.२०.३** दिव्यांग व्यक्तींसाठी असलेली पदे भरावयाच्या एकूण पदसंख्येपैकी असतील.

**४.२०.४** दिव्यांग व्यक्तींची संबंधित संवर्ग/पदाकरीता पात्रता शासनाकडून वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहील.

**४.२०.५** दिव्यांग व्यक्तींसाठी आरक्षित पदांवर शिफारस करताना उमेदवार कोणत्या सामाजिक प्रवर्गातील आहे, याचा विचार न करता दिव्यांग गुणवत्ता क्रमांकानुसार त्यांची शिफारस करण्यात येईल.

**४.२०.६** संबंधित दिव्यांगत्वाच्या प्रकारचे किमान ४०% दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र धारक उमेदवार / व्यक्ती आरक्षण तसेच नियमानुसार अनुज्ञेय सोयी / सवलतीसाठी पात्र असतील.

**४.२०.७** लक्षणीय दिव्यांगत्व असलेले उमेदवार / व्यक्ती खालील सवलतींच्या दाव्यास पात्र असतील:-

(१) दिव्यांगत्वाचे प्रमाण किमान ४०% अथवा त्यापेक्षा जास्त असल्यास तसेच पद लक्षणीय दिव्यांग व्यक्तींसाठी आरक्षित असल्यास नियमानुसार अनुज्ञेय आरक्षण व इतर सोयी सवलती.

(२) दिव्यांगत्याचे प्रमाण किमान ४०% अथवा त्यापेक्षा जास्त असल्यास तसेच पद संबंधित दिव्यांग प्रकारासाठी सुनिश्चित केले असल्यास नियमानुसार अनुज्ञेय सोयी सवलती.

**४.२०.८** लक्षणीय दिव्यांग व्यक्तींसाठी असलेल्या वयोमर्यादेचा अथवा इतर कोणत्याही प्रकारचा फायदा घेऊ इच्छिणा-या उमेदवारांनी शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक अप्रकि-२०१८/प्र.क्र.४६/आरोग्य-६, दिनांक १४ सप्टेंबर, २०१८ मधील आदेशानुसार केंद्र शासनाच्या www.swavlambancard.gov.in अथवा SADM या संगणकीय प्रणालीदवारे वितरित करण्यात आलेले नवीन नमुन्यातील दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.

**४.२०.९ शासन परिपत्रक, दिव्यांग कल्याण विभाग, क्रमांक: दिव्यांग-२०२४/प्र.क्र.८६/दि.क.२, दिनांक २७ जून, २०२४ अन्वये सार्वजनिक आरोग्य विभागाच्या दिनांक १४ सप्टेंबर, २०१८ च्या शासन निर्णयान्वये / भविष्यात वेळोवेळी स्थापन करण्यात आलेल्या / येणाऱ्या वैद्यकीय मंडळामार्फत दिव्यांगत्व प्रमाणपत्र व वैश्विक ओळखपत्र (UDID Card) प्राप्त करुन घेणे अनिवार्य आहे. वैश्विक ओळखपत्र (UDID Card) प्राप्त करुन घेण्यासाठी नोंदणी केल्यानंतर प्रत्यक्षात सदर ओळखपत्र प्राप्त होईपर्यन्तच्या कालावधीसाठी दिव्यांग व्यक्तींना दिव्यांगत्वाच्या सवलती / योजनांचा लाभ घेण्यासाठी त्यांचेकडे असलेले दिव्यांगत्व प्रमाणपत्रासोबत वैश्विक ओळखपत्रासाठीचा नाव नोंदणी क्रमांक (Enrollment Number) सादर करणे अनिवार्य राहील. दिव्यांग उमेदवारांनी अर्ज करताना शासन परिपत्रक, दिव्यांग कल्याण विभाग, क्रमांक: दिव्यांग-२०२४/प्र.क्र.८६/ दि.क.२, दिनांक २७ जून, २०२४ मधील सर्व तरतुदींचे अवलोकन करण्यात यावे. त्यातील तरतुदींनुसार दिव्यांग व्यक्तींच्या आरक्षणासंदर्भात कार्यवाही करण्यात येईल.**

**४.२०.१० दिव्यांग तपशील विधिग्राह्य होण्याकरीता दिव्यांग उमेदवारांना पुढीलप्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक असेल :-**

(१) स्वावलंबन पोर्टलवरुन वितरित दिव्यांग प्रमाणपत्र व वैश्विक ओळखपत्र क्रमांक अशा दोन्ही बाबी उपलब्ध असलेल्या दिव्यांग उमेदवारांनी सदर दोन्ही तपशील नोंदविणे आवश्यक आहे.

(२) ज्या उमेदवारांकडे सद्यस्थितीत स्वावलंबन पोर्टलवरून वितरित केलेले दिव्यांग प्रमाणपत्र नाही. तथापि राज्य शासनाच्या SADM पोर्टलवहन वितरित करण्यात आलेले दिव्यांग प्रमाणपत्र आहे, अशा उमेदवारांनी SADM प्रमाणपत्रासह वैश्विक ओळखपत्रासाठी नोंदणी केल्याचा क्रमांक (Enrolment Number) नोंदविणे अनिवार्य असेल, तथापि, सदर उमेदवारांना मुलाखतीपूर्वी वैश्विक ओळखपत्र सादर करणे आवश्यक असेल.

(३) उमेदवारांनी खात्यामधील दिव्यांगत्वाचा सर्व आवश्यक तपशील अचूकपणे नोंदवावा दिव्यांगत्वाचा तपशील नोंदविताना तो दिव्यांग प्रमाणपत्र व वैश्विक ओळखपत्रावर नमूद केल्याप्रमाणेच असल्याची खात्री करावी उदा. दिव्यांग प्रमाणपत्र क्रमांक, दिव्यांगत्वाची टक्केवारी, वैश्विक ओळखपत्र क्रमांक, वैश्विक ओळखपत्र वितरणाचा दिनांक इत्यादी तपशील वैश्विक ओळखप्रमाणेच असणे आवश्यक आहे.

(४) दिव्यांगत्वाचा सर्व तपशिल अचूकपणे नोंदविल्यानंतर 'Validate या बटनवर क्लिक करावे.

(५) उमेदवाराचे वैश्विक ओळखपत्रावर नमूद नाव दिव्यांगत्याचा प्रकार व दिव्यांग स्थिती (कायमस्वरुपी/तात्पुरतें) इत्यादी तपशील दर्शविले जाईल व सदर तपशील अचूक असल्याचे उमेदवाराने संबंधित बटनवर क्लिक करुन प्रमाणित केल्यानंतर तपशील विधिग्राहा करण्याची प्रक्रिया पूर्ण होईल.

(६) दिव्यांग तपशील विधिग्राह्य होण्याची प्रक्रिया यशस्वीपणे पूर्ण होण्यासाठी उमेदवाराच्या खात्यामध्ये नमूद जन्मदिनांक व वैश्विक ओळखपत्राकरीता नमूद जन्मदिनांक एकच असणे तसेच दिव्यांगत्वाचा सर्व तपशील अचूकपणे नोंदविणे आवश्यक आहे.

**४.२०.११** लक्षणीय दिव्यांगत्व असणा-या उमेदवारांना अर्जामध्ये नमूद केलेला दिव्यांगत्वाचा प्रकार / उप प्रकार बदलणे अनुज्ञेय नाही.

**४.२१ अनाथ आरक्षण :-**

**४.२१.१** अनाथ व्यक्तींचे आरक्षण शासन निर्णय, महिला व बालविकास विभाग, क्रमांक: अनाथ-२०२२/प्र.क्र.१२२/का-०३, दिनांक ०६ एप्रिल, २०२३, दिनांक १० मे, २०२३ अनुसार तसेच शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात येणा-या आदेशानुसार राहील.

**४.२१.२** अनाथ आरक्षण धोरण शासन निर्णय, महिला व बालविकास विभाग, पूरक पत्र, क्रमांक: अनाथ-२०२२/ प्र.क्र.१२२/का-०३, दिनांक १० मे, २०२३ अन्वये एखाद्या भरती प्रक्रियेमध्ये अनाथ आरक्षणाच्या एका प्रवर्गासाठी उपलब्ध जागांवर गुणवत्तेनुसार त्या प्रवर्गातील अनाथ उमेदवार पर्याप्त प्रमाणात उपलब्ध होऊ शकले नाहीत, तर त्या भरती प्रक्रियेमध्ये ती पदे अनाथांच्या दुसऱ्या प्रवर्गातील उमेदवारांमधून गुणवत्तेनुसार भरण्यात येतील.

**४.२१.३** अनाथांसाठी आरक्षित पदावर गुणवत्तेनुसार निवड झालेल्या उमेदवारांचा समावेश उमेदवार ज्या सामाजिक प्रवर्गाचा आहे; त्या प्रवर्गातून करण्यात येईल.

**४.२१.४** पूर्व परीक्षेच्या अर्जाद्वारे अनाथ आरक्षणाचा दावा केलेल्या उमेदवारांनी दिनांक ०६ सप्टेंबर, २०२२, दिनांक ०६ एप्रिल, २०२३ आणि दिनांक १० मे, २०२३ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे विहित करण्यात आलेल्या कार्यपद्धतीनुसार विहित नमुन्यातील अनाथ प्रमाणपत्र व महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र आयोगाकडून निश्चित करण्यात येणाऱ्या विहित कालावधीत सादर करणे आवश्यक राहील. अन्यथा अनाथ आरक्षणाचा दावा विचारात घेतला जाणार नाही.

**५. वेतनश्रेणी :- सर्व संवर्गांसाठी** S-१४ : रुपये ३८६००-१२२८०० अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय इतर भत्ते.

**६. पात्रता :-**

**६.१** भारतीय नागरिकत्व.

**६.२ वयोमर्यादा :-**

**६.२.१** विविध अराजपत्रित प्रवर्ग/ उपप्रवर्गासाठी किमान व कमाल वयोमर्यादा :-

| अ.क्र. | संवर्ग | वयोमर्यादा गणण्याचा दिनांक | वय | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | किमान | कमाल | | प्राविण्य प्राप्त खेळाडू | | माजी सैनिक, आणिबाणी व अल्पसेवा राजादिष्ट अधिकारी | | दिव्यांग उमेदवार |
| | | | अमागास / मागासवर्गीय / आ. दु. घ. | अमागास | मागासवर्गीय / अनाथ/ आ. दु. घ. | अमागास | मागासवर्गीय/ आ. दु. घ. | अमागास | मागासवर्गीय/ आ. दु. घ. | |
| १ | सहायक कक्ष अधिकारी | ०१ फेब्रुवारी, २०२५ | १८ | ३८ | ४३ | ४३ | ४३ | ४३ | ४३ | वयाच्या ४५ वर्षापर्यंत |
| २ | राज्य कर निरीक्षक | | १८ | ३८ | ४३ | ४३ | ४३ | ४३ | ४३ | वयाच्या ४५ वर्षापर्यंत |
| ३ | पोलीस उप निरीक्षक | | १९ | ३१ | ३४ | ३६ | ३६ | ३६ | ३६ | अपात्र |

**६.२.२ शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: एसआरव्ही-२०२४/प्र.क्र.३९/ का.१२ (सेवा) , दिनांक २० डिसेंबर, २०२४ अन्वये कमाल वयोमर्यादेत एकवेळची विशेषबाब म्हणून ०१ वर्ष इतकी शिथिलता देण्यात येत आहे.**

**६.२.३** विहित वयोमर्यादा इतर कोणत्याही बाबतीत शिथिल केली जाणार नाही.

**६.३ अर्हता :-**

**६.३.१. शैक्षणिक अर्हता :-**

**(एक)** मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी किंवा महाराष्ट्र शासनाने विहित केलेली समतुल्य अर्हता.

**(दोन)** मुख्य परीक्षेकरीता अर्हताप्राप्त ठरलेल्या उमेदवारांना मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी विहित पद्धतीने आवश्यक अर्ज/माहिती सादर करण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत पदवी परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य राहील.

**(तीन)**अंतर्वासिता किंवा कार्यशाळेतील प्रत्यक्ष कामाचा अनुभव आवश्यक असेल अशा पदवी धारकाने ही अट मुख्य परीक्षेचा अर्ज/माहिती स्वीकारण्याच्या विहित दिनांकापर्यत पूर्ण केली असली पाहिजे.

**(चार)** मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक.

**६.३.२. शारीरिक पात्रता :-**

**(एक)** पोलीस उपनिरीक्षक संवर्गाकरीता विकल्प नमूद करणाऱ्या उमेदवारांकडे उपरोक्त अर्हतेसोबत खालीलप्रमाणे किमान शारीरिक पात्रता असणे आवश्यक आहे :-

| शारीरिक मोजमाप | पुरुष | महिला | उभयलिंगी |
|---|---|---|---|
| उंची | किमान १६५ सें. मी. (अनवाणी) | किमान १५७ सें.मी. (अनवाणी) | (अ) स्वत:ची लिंग ओळख पुरूष अशी केलेल्या उमेदवारांसाठी - किमान १६५ सें.मी.<br>(ब) स्वत:ची लिंग ओळख महिला/तृतीय पंथी अशी केलेल्या उमेदवारांसाठी - किमान १५७ सें.मी. |
| छाती | न फुगविता ७९ से.मी.<br>फुगविण्याची क्षमता किमान ५ से.मी. आवश्यक | आवश्यक नाही | स्वत:ची लिंग ओळख महिला/पुरूष/तृतीय पंथी अशी केलेल्या उमेदवारांसाठी - आवश्यक नाही. |

**(दोन)** पोलीस उपनिरीक्षक पदावरील नियुक्तीकरीता शिफारस पात्र उमेदवारांची शारीरिक मोजमापे नियुक्ती करण्यापूर्वी शासनामार्फत सक्षम प्राधिका-याकडून तपासून घेण्यात येतील. विहित शारीरिक पात्रता नसल्यास संबंधित उमेदवार नियुक्तीसाठी अपात्र ठरेल.

**६.३.४ अर्हता/पात्रता गणण्याचा दिनांक :-**

मुख्य परीक्षेकरीता अर्ज स्वीकारण्यासाठी विहित अंतिम दिनांकापर्यंत किंवा त्यापूर्वी विहित शैक्षणिक अर्हता धारण केलेली असणे अनिवार्य आहे.

**७. निवडप्रकिया :-**

**७.१** जाहिरातीमध्ये नमूद अर्हता/पात्रतेविषयक अटी किमान असून किमान अर्हता धारण केली म्हणून उमेदवार शिफारशीसाठी पात्र असणार नाही.

**७.२** सेवा भरतीची संपूर्ण प्रक्रिया खालील सेवा प्रवेश नियम अथवा तदनंतर शासनाकडून वेळोवेळी करण्यात येणा-या सुधारणा तसेच आयोगाकडून वेळोवेळी सुधारण्यात येणाऱ्या कार्यनियमावलीतील तरतुदींनुसार राबविण्यात येईल :-

(१) सहायक कक्ष अधिकारी, गट-ब (अराजपत्रित) सेवाप्रवेश नियम २०१८.

(२) राज्य कर निरीक्षक, (विक्रीकर निरीक्षक) गट-ब (अराजपत्रित) सेवाप्रवेश नियम २०२१.

(३) पोलीस उप निरीक्षक, गट-ब (अराजपत्रित) सेवाप्रवेश नियम १९९५.

**८. परीक्षेचे टप्पे —**

**मुख्य परीक्षा :-**

**(एक)** सहायक कक्ष अधिकारी, राज्य कर निरीक्षक, पोलीस उप निरीक्षक संवर्गांकरीता संयुक्त मुख्य परीक्षा - ४०० गुण

**(दोन)** फक्त पोलीस उपनिरीक्षक पदासाठी शारीरिक चाचणी — १०० गुण, मुलाखत-४० गुण

**८.१** विविध संवर्गाकरीता भरती प्रक्रिया खालीलप्रमाणे त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या टप्प्यामध्ये राबविण्यात येईल :-

| अ.क्र. | परीक्षा | संवर्ग | टप्पे |
|---|---|---|---|
| १ | महाराष्ट्र गट-ब (अराजपत्रित) सेवा संयुक्त मुख्य परीक्षा | (१) सहायक कक्ष अधिकारी<br>(२) राज्य कर निरीक्षक | फक्त लेखी परीक्षा |
| | | (३) पोलीस उप निरीक्षक | (१) लेखी परीक्षा<br>(२) शारीरिक चाचणी<br>(३) मुलाखत |

**८.२ मुख्य परीक्षेच्या प्रश्नपत्रिकेचा तपशील खालीलप्रमाणे:-**

| पेपर क्रमांक व संकेतांक | विषय | प्रश्नसंख्या | गुण | दर्जा | माध्यम | कालावधी | प्रश्नपत्रिकेचे स्वरुप |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **महाराष्ट्र गट-ब (अराजपत्रित) सेवा संयुक्त मुख्य परीक्षा** | | | | | | | |
| १ (संकेतांक १०६२) | मराठी | ५० | १०० | बारावी | मराठी | एक तास | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी |
| | इंग्रजी | ५० | १०० | पदवी | इंग्रजी | | |
| २ (संकेतांक १०६३) | सामान्य अध्ययन व बुध्दिमत्ता चाचणी | १०० | २०० | पदवी | मराठी व इंग्रजी | एक तास | |

**८.३** पोलीस उपनिरीक्षक संवर्गातील पदभरतीसाठी शारीरिक चाचणी १०० गुणांची असेल.

**८.४** शारीरिक चाचणीचे गुण अर्हताकारी (Qualifying) स्वरुपाचे असून एकूण गुणांपैकी किमान ६० टक्के गुण (म्हणजेच ६० गुण) मुलाखतीस पात्र होण्यासाठी आवश्यक राहतील. तसेच या गुणांचा अंतिम गुणवत्तेकरीता/अंतिम निवडीकरीता विचार होणार नाही.

**८.५** शारिरीक चाचणीमध्ये किमान ६० टक्के गुण धारण करणा-या उमेदवारांकरीता ४० गुणांची मुलाखत घेण्यात येईल.

**८.६** मुख्य परीक्षेतील गुण व मुलाखतीमधील एकत्रित गुणांच्या आधारे पोलीस उपनिरीक्षक संवर्गाकरीता निवडप्रक्रिया राबविण्यात येईल.

**८.७** आयोगाच्या संकेतस्थळावर स्वतंत्रपणे प्रसिध्द करण्यात आलेल्या प्रस्तुत परीक्षेच्या परीक्षा योजना/ पध्दतीनुसार मुख्य परीक्षेची अंतिम निकाल प्रक्रिया राबविण्यात येईल.

**८.८ मुख्य परीक्षेस प्रवेश :-**

**८.८.१** महाराष्ट्र गट-ब (अराजपत्रित) सेवा संयुक्त पूर्व परीक्षा — २०२४ च्या निकालाच्या आधारे मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या आणि पूर्व परीक्षेच्या जाहिरातीमध्ये नमूद शैक्षणिक अर्हता व अन्य अटींची विहित दिनांकास किंवा त्यापूर्वी पुर्तता करणा-या उमेदवारास मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येईल.

**८.८.२** संयुक्त मुख्य परीक्षेच्या अधिसूचनेस अनुसरुन, अर्ज करणा-या उमेदवारांकडून ते महाराष्ट्र गट-ब (अराजपत्रित) सेवेतील एक किंवा त्यापेक्षा जास्त संवर्ग/पदांसाठी बसू इच्छितात किंवा कसे, याबाबत विकल्प (Option) घेण्यात येईल.

**८.८.३** संबंधित संवर्ग/पदाकरीता उमेदवाराने दिलेला/ले विकल्प हा/हे संबंधित पद भरतीकरीता अर्ज समजण्यात येईल/येतील.

**८.८.४** मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी आयोगाकडून निश्चित केलेल्या सीमांकन रेषा व मर्यादेनुसार मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी अर्हताप्राप्त ठरणाऱ्या तसेच जाहिरात/अधिसूचनेतील तरतुदींनुसार आवश्यक शैक्षणिक अर्हता व अन्य अटींची पूर्तता करणा-या उमेदवारांस मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येईल.

**८.८.५** संयुक्त पूर्व परीक्षेच्या एकत्रित निकालाच्या आधारे गट-ब सेवेच्या मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरणाऱ्या उमेदवारांची प्रस्तुत अधिसूचनेमधील संवर्गांसाठी एकच संयुक्त मुख्य परीक्षा घेण्यात येईल.

**८.८.६** संबंधित संवर्गाच्या मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र उमेदवाराने आयोगाकडून निश्चित करण्यात आलेल्या कालावधीत आयोगाच्या https://mpsconline.gov.in या संकेतस्थळाव्दारे फक्त ऑनलाईन पध्दतीने आवश्यक अर्ज/माहिती सादर करणे आवश्यक राहील.

**८.८.७** महाराष्ट्र गट-ब (अराजपत्रित) सेवा संयुक्त मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारास मुख्य परीक्षेकरीता अर्ज सादर करुन विहित परीक्षा शुल्क भरावे लागेल.

**८.८.८** संयुक्त मुख्य परीक्षेस अर्ज करताना **दिलेला/ले विकल्प** तसेच संवर्गनिहाय भरावयाच्या पदसंख्येच्या तसेच पात्रतेच्या आधारे संबंधित संवर्गाकरीता अर्हताप्राप्त ठरणाऱ्या उमेदवारांसाठी मुख्य परीक्षेचा **स्वतंत्र संवर्गनिहाय** निकाल जाहीर करण्यात येईल.

**८.८.९** सामाजिक तसेच समांतर आरक्षणाच्या वैध दाव्यांच्या आधारे संबंधित उमेदवार मुख्य परीक्षेमध्ये केवळ आरक्षित प्रवर्ग/उपप्रवर्गासाठी विहित केलेल्या गुणांच्या किमान सीमारेषेनुसार अर्हताप्राप्त झाल्यास अंतिम शिफारशींच्या वेळी त्यांची उमेदवारी केवळ संबंधित आरक्षित प्रवर्ग/उपप्रवर्गासाठी विचारात घेतली जाईल. आरक्षित प्रवर्ग/उपप्रवर्गाच्या गुणांच्या किमान सीमारेषेनुसार अर्हताप्राप्त ठरलेल्या उमेदवारांची उमेदवारी अराखीव (खुला) पदावरील निवड/शिफारसीसाठी विचारात घेतली जाणार नाही.

**८.८.१०** उमेदवाराचा मुख्य परीक्षेचा अर्ज सादर करताना दिलेला संवर्गाचा विकल्प विचारात घेऊन पोलीस उपनिरीक्षक संवर्गाच्या शारीरिक चाचणीसाठी पात्र ठरणाऱ्या उमेदवारांची संख्या निश्चित करण्यात येईल.

**८.८.११** प्रस्तुत पदाच्या संयुक्त पूर्व परीक्षेसाठी अर्ज करतेवेळी आवश्यक ती शैक्षणिक अर्हता नसल्यास, मुख्य परीक्षेकरिता आवश्यक अर्ज/माहिती सादर करण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत शैक्षणिक अर्हता प्राप्त केल्यास, अशा उमेदवाराला शैक्षणिक अर्हता प्राप्त केल्याचा दिनांक नमूद करता येईल. अर्जातील इतर कोणत्याही दाव्यामध्ये बदल करता येणार नाही.

**८.९ पोलीस उपनिरीक्षक संवर्गाकरीता शारीरिक चाचणी व मुलाखत:-**

**(एक)** भरावयाच्या एकूण पदांपैकी प्रत्येक आरक्षित प्रवर्ग / उपप्रवर्गासाठी सुमारे ४ पट उमेदवार शारीरिक चाचणीसाठी उपलब्ध होतील, अशा रितीने गुणांची किमान सीमारेषा (Cut Off Line) निश्चित करण्यात येईल.

**(दोन) शारीरिक चाचणी :-**

(१) उंची व छातीविषयक विहित मोजमापाच्या अटी पूर्ण करणाऱ्या उमेदवारांचीच शारीरिक चाचणी घेण्यात येईल. सदर चाचणी पुरुष व महिलांसाठी स्वतंत्र असेल.

(२) शारीरिक चाचणीच्या वेळी उंची व छातीविषयक विहित मोजमापाच्या अटी पूर्ण न करणाऱ्या उमेदवारांची उंची / छाती मापनाविषयी काही तक्रार असल्यास त्यांनी त्याच दिवशी आयोगाकडे आपला तक्रार अर्ज सादर करणे आवश्यक आहे. याबाबत योग्य तो विचारविनिमय करुन अपात्र उमेदवारांच्या उंची / छातीचे फेरमापन घेण्याकरिता उमेदवारांना स्वतंत्रपणे कळविण्यात येईल.

(३) आयोगाच्या वेळापत्रकानुसार अशा उमेदवारांच्या उंची व छातीविषयक फेरमोजमापनाकरिता दिनांक, वेळ व ठिकाण निश्चित करण्यात येईल.

(४) फेरमापनाच्या अनुषंगाने पात्र ठरणाऱ्या उमेदवारांची शारीरिक चाचणी त्याच दिवशी अथवा आयोगाकडून निश्चित करण्यात येणाऱ्या दिनांकास घेण्यात येईल. तसेच शारीरिक चाचणीत पात्र ठरणाऱ्या उमेदवारांची मुलाखत स्वतंत्रपणे घेण्यात येईल.

(५) शारीरिक चाचणी एकूण १०० गुणांची असेल.

(६) शारीरिक चाचणीचे गुण अर्हताकारी (Qualifying) स्वरुपाचे असून एकूण गुणांपैकी किमान ६० टक्के गुण (म्हणजेच ६० गुण) मुलाखतीस पात्र होण्यासाठी आवश्यक राहतील. तसेच या गुणांचा अंतिम गुणवत्तेकरीता/अंतिम निवडीकरीता विचार होणार नाही.

(७) शारीरिक चाचणीतील एकूण गुणांची बेरीज अपूर्णांकात असल्यास ती अपूर्णांकातच ठेवण्यात येईल.

**(८) शारीरिक चाचणीचा तपशील:-**

| पुरुषांसाठी / स्वत:ची लिंग ओळख पुरुष अशी केलेल्या तृतीयपंथी उमेदवारांकरीता | महिलांसाठी / स्वत:ची लिंग ओळख महिला/तृतीयपंथी अशी केलेल्या तृतीयपंथी उमेदवारांकरीता |
|---|---|
| (१) धावणे (८०० मीटर ) - कमाल गुण - ५० | (१) धावणे (४०० मीटर ) - कमाल गुण - ५० |
| (२) पुल अप्स - कमाल गुण - २० | (२) लांब उडी - कमाल गुण - ३० |
| (३) गोळाफेक-वजन-७.२६० कि.ग्रॅ. - कमाल गुण - १५ | (३) गोळाफेक-वजन-४ कि.ग्रॅ.- कमाल गुण - २० |
| (४) लांब उडी - कमाल गुण - १५ | |

(९) शासन अधिसूचना, गृह विभाग, दिनांक २२ जून, २०२३ अनुसार तृतीय पंथी व्यक्तींनी जाहिरातीस अनुसरून अर्ज सादर करताना स्वत:ची लिंग ओळख पुरुष, महिला किंवा तृतीय पंथी असे स्पष्टपणे नमूद करणे आवश्यक आहे.

(१०) तृतीयपंथी उमेदवारास त्यांची पुरुष, महिला किंवा तृतीयपंथी अशी स्वत:ची लिंग ओळख निश्चित करणे आवश्यक राहील व यासंदर्भात सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले विहित नमुन्यातील प्रमाणपत्र शारीरिक चाचणीच्यावेळी सादर करणे आवश्यक राहील.

(११) पोलीस उपनिरीक्षक पदावरील नियुक्तीकरीता शिफारस झालेल्या उमेदवारांची शारीरिक मोजमापे नियुक्ती करण्यापूर्वी शासनामार्फत सक्षम प्राधिका-यांकडून तपासून घेण्यात येतील. वरील परिच्छेद ६.३.२(एक) प्रमाणे विहित शारीरिक पात्रता नसल्यास संबंधित उमेदवार नियुक्तीसाठी अपात्र ठरेल.

**(तीन) मुलाखत:-**

(१) शारीरिक चाचणीच्या निकालाच्या आधारे मुलाखतीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांनाच मुलाखतीसाठी बोलाविण्यात येईल.

(२) पोलीस उपनिरीक्षक संवर्गाकरीता मुलाखत ४० गुणांची असेल.

(३) मुलाखतीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची पात्रता जाहिरात/अधिसूचनेतील अर्हता/अटी व शर्तीनुसार मूळ कागदपत्राच्या आधारे तपासली जातील आणि अर्जातील दाव्यानुसार मूळ कागदपत्र सादर करणाऱ्या उमेदवारांची मुलाखत घेतली जाईल.

**८.१० गुणवत्ता यादी:-**

**(१)** पोलीस उपनिरीक्षक संवर्गाकरीता शारीरिक चाचणी व मुलाखतीनंतर मुख्य परीक्षा व मुलाखतीमध्ये प्राप्त एकूण गुणांच्या आधारे गुणवत्ताक्रमानुसार सर्वसाधारण गुणवत्ता यादी (General Merit List) तयार करण्यात येईल.

**(२)** सहायक कक्ष अधिकारी, राज्य कर निरीक्षक, संवर्गातील निवडीकरीता संयुक्त मुख्य परीक्षेमध्ये प्राप्त केलेल्या एकूण गुणांच्या आधारे गुणवत्ताक्रमानुसार **संवर्गनिहाय** सर्वसाधारण गुणवत्ता यादी (General Merit List) तयार करण्यात येईल.

**(३)** गुणवत्ता यादीमधील समान गुण धारण करणाऱ्या उमेदवारांची क्रमवारी (Ranking) आयोगाच्या दिनांक १२ सप्टेंबर, २०२२ रोजीच्या प्रसिद्धीपत्रकातील तरतुदीनुसार निश्चित करण्यात येईल.

**८.११ अंतिम निकाल प्रक्रिया**

**८.११.१ भरतीप्रक्रियेतून बाहेर पडणे (Opting Out):-**

**(१)** प्रथम वरील कार्यपद्धतीनुसार सर्व संवर्गासाठी संवर्गनिहाय स्वतंत्र सर्वसाधारण गुणवत्ता यादी (General Merit List) तसेच तात्पुरती निवड यादी (Provisional Selection List) आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.

**(२)** तात्पुरती निवड यादीच्या आधारे भरतीप्रक्रियेतून बाहेर पडण्याचा (ऑप्टिंग आऊट) पर्याय सादर करण्यासाठी संबंधित उमेदवारांना ७ दिवसांचा कालावधी देण्यात येईल.

**(३)**आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीद्वारे उमेदवारांकडून प्राप्त " भरतीप्रक्रियेतून बाहेर पडणे " हा पर्याय लक्षात घेऊन पोलीस उप निरीक्षक संवर्ग वगळून इतर संवर्गांसाठी सुधारीत तात्पुरती निवड यादी तयार करण्यात येईल.

(४)पदभरतीकरीता भरतीप्रक्रियेतून बाहेर पडणे याबाबतची कार्यवाही फक्त आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीद्वारे विहित कालावधीमध्ये करणे अनिवार्य आहे. यासंदर्भातील इतर कोणत्याही पद्धतीने केलेल्या तसेच नंतरच्या टप्प्यावर भरती प्रक्रियेतून बाहेर पडण्याचा पर्याय रद्द करण्यासंदर्भात केलेल्या विनंतीचा विचार केला जाणार नाही.

**(५)** पोलीस उपनिरीक्षक संवर्गासाठी शारिरीक चाचणी व मुलाखतीनंतर जाहीर केलेल्या सर्वसाधारण गुणवत्ता यादी व तात्पुरत्या निवड यादीनुसार भरतीप्रक्रियेतून बाहेर पडण्याचा पर्याय उमेदवारांना देण्यात येईल व हा पर्याय विचारात घेऊन पोलीस उपनिरीक्षक संवर्गाची अंतिम शिफारस यादी तयार करण्यात येईल.

**८.११.२ संमती विकल्प (Consent Submission) :- (पोलीस उपनिरीक्षक वगळून इतर सर्व संवर्गांसाठी)**

(१) उपरोक्तप्रमाणे **भरतीप्रक्रियेतून बाहेर पडण्याचा पर्याय (Opting Out)** दिल्यानंतर पोलीस उपनिरीक्षक संवर्ग वगळून उर्वरित संवर्गांसाठी सुधारित तात्पुरती निवड यादी प्रसिद्ध करण्यात येईल.

(२) महाराष्ट्र गट ब (अराजपत्रित) सेवा संयुक्त मुख्य परीक्षेतील पोलीस उप निरीक्षक संवर्ग वगळता इतर संवर्गांकरीता आयोगाकडून प्रसिद्ध करण्यात आलेल्या संवर्गनिहाय सुधारीत तात्पुरत्या निवड यादीमध्ये (Revised Provisional Selection List) उमेदवाराची एकापेक्षा जास्त संवर्गासाठी निवड होत असल्यास अशा उमेदवारांकडून प्रथम पसंती (First Choice) बाबत संमती विकल्प ( Consent Submission) मागविण्यात येईल. उमेदवाराचा विचार फक्त संमती विकल्प दिलेल्या संवर्गासाठी करण्यात येईल.

(३) सदर संमती विकल्प (Consent Submission) आयोगाकडून सुधारीत तात्पुरती निवड यादी (Revised Provisional Selection List) प्रसिद्ध केल्यानंतर उमेदवाराच्या प्रोफाईल मध्ये उपलब्ध करुन देण्यात येईल.

(४) एका पेक्षा जास्त संवर्गासाठी उमेदवाराची निवड झाल्यास सुधारीत तात्पुरत्या निवड यादीतील (Revised Provisional Selection List) ज्या एका संवर्गाची निवड उमेदवारास स्वीकारावयाची **असेल**, त्याकरीता उमेदवारास **" स्वीकारले " (Accepted)"** हा पर्याय निवडणे अनिवार्य आहे.

(५) सुधारीत तात्पुरत्या निवड यादीतील (Revised Provisional Selection List) ज्या संवर्गाची निवड उमेदवारास स्वीकारावयाची **नसेल**, त्या संवर्गासाठी उमेदवारास **" Give up"** हा पर्याय निवडणे अनिवार्य आहे.

(६) उमेदवाराने ज्या संवर्गासाठी **" Give up"** हा पर्याय निवडला असेल, त्या संवर्गाकरीता त्यांच्या उमेदवारीचा विचार न करता इतर उमेदवारांचा गुणवत्तेवर विचार करण्यात येईल.

(७) आयोगाकडून निश्चित केलेल्या कालावधीत विहीत ऑनलाईन पध्दतीने संमती विकल्प सादर न केल्यास मुख्य परीक्षेच्या जाहिरातीतील/अधिसूचनेतील संवर्गाच्या क्रमानुसार संबंधित उमेदवाराचा अंतिम निवडीकरीता विचार करण्यात येईल. म्हणजेच उमेदवाराची पसंती मुख्य परीक्षेच्या जाहिरातीतील नमूद संवर्गाच्या क्रमवारीनुसार ग्राह्य धरून प्रथम क्रमांकाच्या संवर्गाकरीता स्वीकारले (Accepted) व उर्वरीत संवर्गाकरीता त्याने Give Up केले असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(८) संवर्गाचे विकल्प, भरतीप्रक्रियेतून बाहेर पडणे (Opting Out) तसेच 'संमती विकल्प (Consent Submission)' याबाबतची कार्यवाही फक्त आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीद्वारे विहित कालावधीमध्ये करणे अनिवार्य असेल.

(९) भरतीप्रक्रिये दरम्यान विहित कालावधीनंतर संमती विकल्प (Consent Submission) सादर करण्याची अथवा त्यामध्ये बदल करण्याची विनंती कोणत्याही परिस्थितीत मान्य करण्यात येणार नाही.

**८.११.३** तात्पुरत्या निवड यादीस अनुसरून लागू असेल त्याप्रमाणे भरतीप्रक्रियेतून बाहेर पडण्याचा (ऑप्टिंग आऊट), 'संमती विकल्प (Consent Submission)' इत्यादीचा पर्याय सादर केलेल्या उमेदवारांचा विदा (Data) लक्षात घेऊन संवर्गनिहाय अंतिम शिफारस यादी (Final Recommendation List) तयार करण्यात येईल.

**८.११.४** महाराष्ट्र गट-ब (अराजपत्रित) सेवेतील संवर्गांकरीता आयोगाच्या धोरणानुसार प्रतिक्षा यादी राहील.

**८.११.५** गुणवत्ता यादीमधील समान गुण धारण करणा-या उमेदवारांची क्रमवारी(Ranking) आयोगाच्या दिनांक १२ सप्टेंबर, २०२२ रोजीच्या प्रसिद्धीपत्रकामधील तरतुदीनुसार निश्चित करण्यात येईल.

**८.११.६** सहायक कक्ष अधिकारी, राज्य कर निरीक्षक संवर्गाकरीता मुख्य परीक्षेमधून पात्र होण्याकरीता शतमत (Percentile) पध्दत लागू आहे.

**८.११.७** पोलीस उपनिरीक्षक पदाकरीता मुख्य परीक्षेमधून शारीरिक चाचणीसाठी पात्र होण्याकरीता शतमत **(Percentile)** पध्दत लागू आहे.

८.११.८ प्रस्तुत परीक्षेमध्ये सर्वाधिक गुण मिळविणा-या उमेदवारांच्या एकूण गुणांच्या खालीलप्रमाणे किमान गुण प्राप्त करणारे उमेदवार शिफारशीसाठी तसेच शारीरिक चाचणीसाठी पात्र असतील :-

**(१) अमागास - किमान ३५ शतमत**

**(२) मागासवर्गीय - किमान ३० शतमत**

**(३) दिव्यांग - किमान २० शतमत**

**(४) अत्युच्च गुणवत्ताधारक पात्र खेळाडू - किमान २० शतमत**

**(५) अनाथ - किमान ३० शतमत**

**९. शिफारस:-**

**८.१"उमेदवारांना सर्वसाधारण सूचना"** मध्ये नमूद केलेल्या कार्यपध्दतीनुसार उमेदवारांच्या शिफारसी शासनाच्या संबंधित विभागाकडे करण्यात येतील.

**८.२** सर्व संवर्गाकरीता मुख्य परीक्षेमधून शिफारसपात्र होण्याकरीता शतमत (**Percentile**) पध्दत लागू राहील.

**८.४** समांतर आरक्षणाच्या आधारे किमान गुणांच्या सीमारेषेनुसार शिफारशीसाठी पात्र ठरणाऱ्या उमेदवारास कोणतीही एक सवलत देय राहील.

**८.५** शिफारसपात्र उमेदवारांची नावे आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येतील.

**८.६** शिफारशीनंतर नियुक्तीसाठी शासनाकडे शिफारस करण्यात आली आहे किंवा नाही, याबाबत उमेदवारांना प्रोफाईलद्वारे कळविण्यात येईल.

**१०. प्रमाणपत्र पडताळणी:-**

**१०.१** संबंधित मुख्य परीक्षेच्या निकालाच्या आधारे शिफारस पात्र ठरलेल्या उमेदवारांना प्रमाणपत्र पडताळणीसाठी आवश्यकतेनुसार मुख्य परीक्षेच्या निकालापूर्वी, निकालानंतर अथवा नियुक्तीपूर्वी सक्षम प्राधिका-यांकडून बोलविण्यात येईल.

**१०.२** आयोगाने निश्चित केलेल्या किमान सीमारेषेनुसार शिफारस पात्र ठरलेल्या उमेदवारांची पात्रता जाहिरात/ शासन परिपत्रकातील अर्हता/अटी व शर्तीनुसार मूळ कागदपत्राच्या आधारे तपासली जाईल.

**१०.३** अर्जातील दाव्यानुसार मूळ कागदपत्र सादर करणाऱ्या उमेदवारांची प्रमाणपत्र पडताळणी केली जाईल.

**१०.४** विहित कागदपत्रे सादर करू न शकणाऱ्या उमेदवारांची उमेदवारी रद्द करण्यात येईल. तसेच त्याकरीता कोणतीही मुदतवाढ देण्यात येणार नाही.

**१०.५** प्रमाणपत्र पडताळणी यासंदर्भात निश्चित करण्यात आलेल्या कार्यक्रमानुसार तसेच निश्चित केलेल्या ठिकाणी व विहित वेळेस घेण्यात येतील. त्याकरीता उमेदवारास स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

**१०.६** केवळ अर्जातील दाव्यानुसार करण्यात आलेल्या प्रमाणपत्र पडताळणीच्या आधारे पात्र ठरलेले उमेदवार शिफारस/ नियुक्तीसाठी पात्र ठरतील.

**११. मुख्य परीक्षेकरीता अर्ज करण्याची पध्दत :-**

**११.१ अर्ज सादर करण्याचे टप्पे :-**

**(एक)** आवश्यक असल्यास खाते अद्ययावत करणे.

**(दोन)** विहित कालावधीत तसेच विहित पध्दतीने खालीलप्रमाणे लागू असेल त्याप्रमाणे आवश्यक कागदपत्रे अपलोड करुन अर्ज सादर करणे .

**(तीन)** परीक्षा शुल्काचा भरणा विहित पध्दतीने करणे.

**(चार)** जिल्हा केंद्र निवड करणे.

**११.२ विहित कागदपत्रे/प्रमाणपत्रे अपलोड करणे :-**

**(एक)**प्रोफाईलद्वारे केलेल्या विविध दाव्यांच्या अनुषंगाने उमेदवारांची पात्रता आजमावल्यानंतर (Check eligibility) उमेदवार जाहिरातीनुसार पात्र ठरत असल्यास अर्ज सादर करताना खालील कागदपत्रे/प्रमाणपत्रे (लागूअसलेली) अपलोड करणे अनिवार्य आहे :-

| अ. क्र. | प्रमाणपत्र/कागदपत्र | फाईल फॉर्मेट | किमान फाईल साईज (KB) | कमाल फाईल साईज (KB) |
|---|---|---|---|---|
| १ | एस.एस.सी. अथवा तत्सम शैक्षणिक अर्हता | PDF | ५० | ५०० |
| २ | वयाचा पुरावा | PDF | ५० | ५०० |
| ३ | शैक्षणिक अर्हता इत्यादीचा पुरावा | PDF | ५० | ५०० |
| ४ | सामाजिकदृष्टया मागासवर्गीय असल्याबाबतचा पुरावा | PDF | ५० | ५०० |
| ५ | आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील असल्याबाबतचा पुरावा | PDF | ५० | ५०० |
| ६ | नॉन-क्रिमीलेयर प्रमाणपत्र | PDF | ५० | ५०० |
| ७ | पात्र दिव्यांग व्यक्ती असल्याचा पुरावा | PDF | ५० | ५०० |
| ८ | पात्र माजी सैनिक असल्याचा पुरावा | PDF | ५० | ५०० |
| ९ | खेळाडूसाठीच्या आरक्षणाकरीता पात्र असल्याचा पुरावा | PDF | ५० | ५०० |
| १० | अनाथ आरक्षणासाठी पात्र असल्याचा पुरावा | PDF | ५० | ५०० |
| ११ | मागासवर्गीय, आ.दु.घ., अराखीव माहिला, खेळाडू, दिव्यांग, माजी सैनिक, अनाथ आरक्षणाचा दावा असल्यास अधिवास प्रमाणपत्र | PDF | ५० | ५०० |
| १२ | विवाहित स्त्रियांच्या नावात बदल झाल्याचा पुरावा | PDF | ५० | ५०० |
| १३ | मराठी भाषेचे ज्ञान असल्याचा पुरावा(लागू असल्यास) | PDF | ५० | ५०० |
| १४ | लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन | PDF | ५० | ५०० |

**(दोन)** उपरोक्त प्रमाणपत्र/कागदपत्रे आयोगाच्या संकेतस्थळावरील उमेदवारांना सर्वसाधारण सूचना प्रकरण क्रमांक चार तसेच प्रस्तुत अधिसूचनेमध्ये नमूद केल्याप्रमाणे असणे अनिवार्य आहे.

**(तीन)** संबंधित जाहिरातीस अनुसरुन विहित निकष/पात्रता तसेच प्रोफाईलमधील दाव्यांच्या अनुषंगाने प्रमाणपत्रे/कागदपत्रे अपलोड करावी लागतील. प्रोफाईलमधील विविध दाव्यांच्या अनुषंगाने अपलोड करावयाची संबधित कागदपत्रे प्रणालीद्वारे अर्ज सादर करताना प्रदर्शित होतील.

**(चार)** पात्रतेसंदर्भातील विविध दाव्यांच्या अनुषंगाने प्रमाणपत्रे/कागदपत्रे अपलोड केल्याशिवाय अर्ज सादर करता येणार नाही.

**११.३ सर्वसाधारण :-**

**(एक)** अर्ज फक्त आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीद्वारे स्वीकारण्यात येतील.

**(दोन)** अर्ज सादर करण्याकरीता संकेतस्थळ :- https://mpsconline.gov.in

**(तीन)** अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना आयोगाच्या https://mpsconline.gov.in तसेच https://mpsc.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

**(चार)** आयोगास अर्ज सादर केल्यानंतर विहित मुदतीत परीक्षा शुल्क भरल्याशिवाय अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

**११.४ जिल्हा केंद्र निवड :-**

**(एक)** प्रस्तुत मुख्य परीक्षा अमरावती, छत्रपती संभाजी नगर, नागपूर, नाशिक, नवी मुंबई व पुणे जिल्हा केंद्रांवर घेण्यात येईल. अर्ज सादर करतानाच जिल्हा केंद्राची निवड करणे आवश्यक आहे.

**(दोन)** जिल्हा केंद्र बदलाबाबतची विनंती कोणत्याही परिस्थितीत अथवा कोणत्याही कारणास्तव मान्य करण्यात येणार नाही

**(तीन)** एखादे जिल्हा केंद्र कार्यान्वित होऊ शकले नाही अथवा एखाद्या जिल्हा केंद्रांवर उमेदवारांना प्रवेश देण्याची क्षमता ओलांडली गेली तर ते जिल्हाकेंद्र निवडलेल्या उमेदवारांची बैठक व्यवस्था जवळच्या दुस-या जिल्हा केंद्रावर करण्यात येईल.

**(चार)** एकदा निवडलेल्या जिल्हा केंद्रामध्ये अथवा आयोगाने निश्चित केलेल्या परीक्षा उपकेंद्रामध्ये बदल करण्याची विनंती कोणत्याही कारणास्तव मान्य करण्यात येणार नाही.

**(पाच)**वरीलप्रमाणे जिल्हा केंद्रनिवडीची प्रक्रिया पूर्ण न केल्यास उमेदवाराने अर्जामध्ये दिलेल्या कायमस्वरुपी रहिवासाच्या पत्त्याच्याआधारे संबंधित महसुली मुख्यालयाच्या जिल्हाकेंद्रावर किंवा नजिकच्या जिल्हाकेंद्रावर प्रवेश देण्यात येईल. याबाबत आयोगाचे त्या त्या वेळचे धोरण व आयोगाचा निर्णय अंतिम मानण्यात येईल.

**११.५ परीक्षा शुल्काचा भरणा:-**

**११.५.१ परीक्षा शुल्क (रुपये) :**

**(एक)** अमागास - **रु. ५४४/-**

**(दोन)** मागासवर्गीय/आ.दु.घ./अनाथ/दिव्यांग - **रु. ३४४/-**

**(तीन)** उपरोक्त परीक्षा शुल्काव्यतिरिक्त बँक चार्जेस तसेच त्यावरील देय कर अतिरिक्त असतील.

**(चार)** परीक्षा शुल्क ना-परतावा (Non-refundable) आहे.

**११.५.२** अर्ज सादरीकरणाचे टप्पे पूर्ण झाल्यावर उपलब्ध होणाऱ्या ‘Submit and Pay fees’ या बटनवर क्लिक केल्यानंतर किंवा मुख पृष्ठावरील 'माझे खाते' या सदराखालील अर्ज केलेल्या पदांच्या यादीतील ‘Fees not Paid' अशी सद्यस्थिती लिहिलेल्या जाहिरात/पद/परीक्षेसमोरील ' Pay Now' या लिंकवर क्लिक करुन परीक्षा शुल्काचा भरणा करता येईल.

**११.५.३** परीक्षा शुल्काचा भरणा खालील दोन पध्दतीने करता येईल:-

(एक) **ऑनलाईन पध्दतीने :-**

**(१)** भारतीय स्टेट बँक तसेच प्रणालीद्वारे उपलब्ध करून दिलेल्या कोणत्याही एका पेमेंट गेटवेच्या माध्यमातून क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड अथवा नेटबँकिंगद्वारे परीक्षा शुल्क अदा करता येईल.

**(२)** परीक्षा शुल्काचा भरणा करताना बँक खात्यामधून परीक्षा शुल्काच्या रकमेची वजावट झाल्यावर परीक्षा शुल्काचा भरणा यशस्वीपणे झाला (Payment Successful) असल्याचा संदेश आयोगाच्या ऑनलाईन अर्जप्रणालीच्या पृष्ठावर प्रदर्शित झाल्याशिवाय व परीक्षा शुल्काची पावती तयार झाल्याशिवाय संकेतस्थळावरील संबंधित पृष्ठावरून आणि/अथवा खात्यातून लॉगआऊट होऊ नये.

**(३)** परीक्षा शुल्काचा भरणा केल्यानंतर उमेदवाराला त्याच्या प्रोफाईलमध्ये परीक्षा शुल्काचा भरणा यशस्वी झाला आहे किंवा कसे, याची स्थिती (status)लगेचच अवगत होईल. खात्यातून Logout होण्यापूर्वी परीक्षा शुल्क यशस्वीपणे भरले असल्याबाबत व बँकेकडून व्यवहार (Transaction) पूर्ण झाला असल्याबाबत खात्री करण्याची जबाबदारी उमेदवाराची आहे.

**(४)**कोणत्याही कारणामुळे विहित कालावधीत ऑनलाईन पद्धतीने परीक्षा शुल्काचा भरणा यशस्वीपणे करणे शक्य न झाल्यास अर्ज करण्याच्या अंतिम दिनांकानंतर दोन दिवसापर्यंत परीक्षाशुल्काचा भरणा ऑफलाईन पद्धतीने करण्याकरीता चलनाची प्रत घेता येईल.

(दोन) **ऑफलाईन पध्दतीने :- चलनाद्वारे**

चलनाद्वारे परीक्षा शुल्काचा भरणा करण्याचा विकल्प निवडल्यास उपलब्ध होणारी चलनाची प्रत घेऊन भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेत बँकेच्या कार्यालयीन वेळेत विहित अंतिम दिनांकापूर्वी परीक्षा शुल्काचा भरणा करता येईल. तथापि, चलनाची प्रत घेणे व बँकेत शुल्क जमा करणे, यामध्ये किमान तीन तासांचे कालावधी राहील, याची दक्षता घ्यावी.

**११.५.४** परीक्षा शुल्काचा भरणा यशस्वी न झाल्यास पुन्हा शुल्क भरण्याची अथवा चलन घेण्याबाबतची कार्यवाही प्रस्तुत जाहिरातीच्या/अधिसूचनेच्या अनुषंगाने विहित दिनांकापूर्वीच करणे आवश्यक आहे. कोणत्याही कारणास्तव व्यवहार अयशस्वी ठरल्यास यासंदर्भातील तक्रारीची आयोगाकडून दखल घेतली जाणार नाही.

**११.५.५**विहित मुदतीत परीक्षा शुल्काचा भरणा करु न शकलेल्या उमेदवारांचा संबंधित भरतीप्रक्रियेकरीता विचार केला जाणार नाही. यासंदर्भात आयोगाच्या संकेतस्थळावरील उमेदवारांना सर्वसाधारण सूचनांमधील संबंधित तरतुदींचे अवलोकन करणे उमेदवारांच्या हिताचे राहील.

**१२. प्रवेशप्रमाणपत्र :-**

**१२.१** परीक्षेस प्रवेश दिलेल्या उमेदवारांची प्रवेशप्रमाणपत्रे आयोगाच्या ऑनलाईन अर्जप्रणालीच्या संकेतस्थळावर (https://mpsconline.gov.in) उमेदवारांच्या प्रोफाईलद्वारे परीक्षेपूर्वी सर्वसाधारणपणे **७** दिवस अगोदर उपलब्ध करुन देण्यात येईल. त्याची प्रत परीक्षेपूर्वी डाऊनलोड करुन घेणे व परीक्षेच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

**१२.२** परीक्षेच्या वेळी उमेदवाराने स्वत:चे प्रवेशप्रमाणपत्र आणणे सक्तीचे आहे. त्याशिवाय, परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.

**१२.३** प्रवेश प्रमाणपत्र उपलब्ध करून देण्यात आल्यानंतर उमेदवाराला त्याच्या आयोगाकडील नोंदणीकृत मोबाईल क्रमांकावर लघुसंदेशाद्वारे कळविण्यात येईल. याबाबतची घोषणा आयोगाच्या संकेतस्थळावर परीक्षेपूर्वी एक सप्ताह अगोदर प्रसिद्ध करण्यात येईल.

**१२.४** परीक्षेच्या दिनांकापूर्वी ३ दिवस अगोदर प्रवेश प्रमाणपत्र प्राप्त न झाल्यास अर्ज सादर केल्याच्या आवश्यक पुराव्यासह आयोगाच्या कार्यालयाकडे संपर्क साधावा.

**१२.५** परीक्षेच्यावेळी स्वत:च्या ओळखीच्या पुराव्यासाठी स्वत:चे आधार कार्ड, निवडणूक आयोगाचे ओळखपत्र, पासपोर्ट, पॅन कार्ड किंवा फक्त स्मार्ट कार्ड प्रकारचे ड्रायव्हिंग लायसेन्स यापैकी किमान कोणतेही **एक मूळ ओळखपत्र** तसेच मूळ ओळखपत्राची छायांकित प्रत सोबत आणणे अनिवार्य आहे.

**१२.६** आधार कार्डच्या ऐवजी भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरण (UIDAI) च्या संकेतस्थळावरुन डाऊनलोड केलेले ई-आधार सादर करणा-या उमेदवारांच्या बाबतीत ई-आधार वर उमेदवाराचे नाव, पत्ता, लिंग, फोटो, जन्मदिनांक या तपशीलासह आधार निर्मितीचा दिनांक (Date of Aadhaar generation) व आधार डाऊनलोड केल्याचा दिनांक असल्यासच तसेच सुस्पष्ट फोटोसह **रंगीत प्रिंट** मध्ये आधार डाऊनलोड केले असल्यासच ई-आधार वैध मानण्यात येईल.

**१२.७** नावांमध्ये बदल केलेला असल्यास विवाह निबंधक यांनी दिलेला दाखला (विवाहित स्त्रियांच्या बाबतीत), नावांत बदल झाल्यासंबंधी अधिसूचित केलेले राजपत्र किंवा राजपत्रित अधिकारी यांच्याकडून नावांत बदल झाल्यासंबंधीचा दाखला व त्याची छायांकित प्रत परीक्षेच्यावेळी सादर करणे आवश्यक आहे.

**१३. सेवाप्रवेशोत्तर शर्ती :-**

नियुक्त झालेल्या व्यक्तीस खालील परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील :-

**(एक)** जेथे प्रचलित नियमानुसार विभागीय/व्यावसायिक परीक्षा विहित केली असेल अथवा आवश्यक असेल तेथे त्यासंबंधी केलेल्या नियमानुसार विभागीय/व्यावसायिक परीक्षा

**(दोन)** हिंदी आणि मराठी भाषा परीक्षेसंबंधी केलेल्या नियमानुसार जर ती व्यक्ती अगोदर परीक्षा उत्तीर्ण झाली नसेल किंवा तिला उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाली नसेल तर ती परीक्षा

(**तीन**) शासन निर्णय, माहिती तंत्रज्ञान(सा.प्र.वि.), क्रमांक: मातंसं-२०१२/प्र.क्र.२७७/३९, दिनांक ०४ फेब्रुवारी, २०१३, शासन पूरकपत्र, क्रमांक मातंसं-२०१२/प्रक्र.२७७/३९, दिनांक ०८ जानेवारी, २०१८ व १६ जुलै, २०१८ अथवा महाराष्ट्र शासनाच्या माहिती तंत्रज्ञान संचालनालयाने यासंदर्भात वेळोवेळी विहित केलेली संगणक हाताळणीबाबतची प्रमाणपत्र परीक्षा

**१४.** प्रस्तुत अधिसूचनेमध्ये परीक्षेसंदर्भातील संक्षिप्त तपशील दिलेला आहे. अर्ज स्वीकारण्याची पध्दत, आवश्यक अर्हता, आरक्षण, वयोमर्यादा, शुल्क, निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया, परीक्षा योजना, अभ्यासक्रम, अर्जासोबत सादर करण्यावयाची कागदपत्रे इत्यादीबाबतच्या सविस्तर तपशिलासाठी आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावरील स्पर्धा परीक्षेअंतर्गत '**उमेदवारांना सर्वसाधारण सूचना**', संकेतस्थळावरील विविध विभाग/उपविभागांमध्ये (Menu/Sub-menu) वेळोवेळी देण्यात आलेल्या सूचना, परिपत्रके इत्यादी तसेच "**परीक्षा योजना**" विभागातील **'महाराष्ट्र गट-ब (अराजपत्रित) सेवा संयुक्त परीक्षा '** मध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीचे कृपया अवलोकन करावे. आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली माहिती व अधिसूचना अधिकृत समजण्यात येईल.

**१५.** प्रस्तुत परीक्षेच्या आयोजनाच्या दिनांकास अन्य संस्थेची परीक्षा असल्यास उमेदवारास कोणती परीक्षा द्यावयाची आहे; याबाबतचा निर्णय उमेदवाराने स्वत: घेणे आवश्यक राहील.

**१६.** पदभरतीसंदर्भात काही अनुचित प्रकार घडल्यास महाराष्ट्र स्पर्धा परीक्षा (अनुचित मार्गास प्रतिबंध) अधिनियम, २०२४ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून कार्यवाही करण्यात येईल.

**१६.** सदर अधिसूचना आयोगाच्या https://mpsc.gov.in तसेच https://mpsconline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

ठिकाण : नवी मुंबई.
दिनांक : **१९ मे, २०२५**

उप सचिव, जाहिरात
महाराष्ट्र लोकसेवा आयोग.

(**१**) आयोगाच्या कार्यालयात, परीक्षा कक्षात, परीक्षा केंद्राच्या परिसरात, तसेच, शारीरिक चाचणी व मुलाखतीच्या वेळी मोबाईल फोन, अथवा इतर कोणत्याही प्रकारची इलेक्ट्रॉनिक साधने आणण्यास व वापरण्यास सक्त मनाई आहे. (**२**) प्रमाणपत्र तपासणीच्या वेळी पात्रतेसंदर्भातील सर्व मूळ प्रमाणपत्रे सादर न केल्यास शिफारस/नियुक्तीसाठी विचार करण्यात येणार नाही.